**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ चा जबाब**

साक्षीदाराचे नावः– **नामदेव बाबुराव काळे,**

वयः– ४० वर्षे, व्यवसायः– शेती**,**

राहणारः– गिरजा नगरी कॉलनी**, निलंगा, ता. निलंगा. जिल्हा लातूर**.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकरी विधीज्ञ श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचेमार्फत शपथेवर सुरुः–**

**०१.** दि.०५/०४/२०२६ रोजी सकाळी ७.४५ वाजण्याच्या दरम्यान मी आणि माझी पत्नी केळगांव येथे शेताकडे गेलो होतो. त्याच दिवशी ११.४५ च्या दरम्यान माझा मुलगा विश्वजीत याने मला फोन केला. त्याने मला आनंद नगर येथे कपडे शिवण्यास तो आणि मुलगी वैष्णवी जात असल्याचे सांगितले. दुपारी १२.३० च्या सुमारास मला विश्वजीत याने पुन्हा फोन केला. त्याने मला मी घरी आलो आहे हे विचारले. त्याने मला सांगितले की घराचा मुख्य दरवाजा उघडा आहे, मी त्याला आम्ही दोघेही शेतात असल्याचे सांगितले मी त्याला मोबाईल चालु ठेवुन घरात जाण्याचे सांगितले. त्याने घरात जावुन पाहिले त्यानंतर मला सांगितले की, सर्व कागदपत्रे विस्कळीत झालेले आहेत, लाकडी कपाट तोडलेले आहे, तुम्ही घरी या असे सांगितले. दुपारी १.०० ते १.३० च्या सुमारास आम्ही घरी आलो. घराच्या मुख्य दरवाजाचे लॉक तोडलेले होते, कपाटात पाहिले तर कपाटामधील स्टीलच्या डब्यातील प्रत्येकी ५ ग्रॅमच्या दोन अंगठया व रोख रक्कम ५००/– रूपयेच्या ३४ नोटा चोरीला गेल्याचे समजले. त्यानंतर दुस–या दिवशी अज्ञात आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली. मला ही तक्रार दाखविल्यास ओळखु शकतो. (आता मला प्रस्तुत

कामातील दि.०६.०४.२०२६ रोजीची तक्रार दाखवण्यात आली) ती तक्रार मी दिलेली असुन त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशानी १८** देण्यात आली.

२. तपास अधिकारी सोळंके यांनी मला दि.२६.०५.२०२६ रोजी फोन करून पोलिस स्टेशनला बोलावले. त्यांनी मला जप्त केलेला मुद्देमाल आणि आरोपी दाखविला. त्यामध्ये ५ ग्रॅमची एक अंगठी आणि १००००/– रूपये रकमेच्या प्रत्येकी ५००/– रूपयेच्या २० नोटा होत्या. त्यांनी दाखविलेला आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. साक्षीदाराने आरोपीकडे इशारा करून तोच असल्याचे ओळखले. जप्त मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखु शकतो. (आता मला एम.आर.नं. ६९/२०२६ वरील ५ ग्रॅमची एक अंगठी आणि १००००/– रूपये रकमेच्या प्रत्येकी ५००/– रूपयेच्या २० नोटा दाखविल्या.) जप्त अंगठी ही माझीच आहे. तसेच जप्त नोटा या माझ्याच आहेत. पोलिसांनी माझा पुरवणी जबाब घेतलेला होता. (आता मला प्रस्तुत कामातील २६.०५.२०२६ रोजी पुरवणी जबाब दाखवण्यात आला.) तो जबाब मी दिलेला असुन त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशानी १९** देण्यात आली.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे अॅड के.एन.पवार यांच्यामार्फत सुरुः–</u>**

**०३**. माझ्या घराच्या शेजारी लोकांची वरदळ असते. घटनास्थळ पंचनामा किती तारखेला झाला ते मला निश्चित सांगता येत नाही. पंचनामा एक तास चालला होता. पोलिस घटनास्थळ पंचनम्यासाठी ४.०० वाजता आले होते तो पंचनामा ५.३० पर्यंत चालला होता. घटनास्थळ पोलिसांना मी दाखवले. पंच साक्षीदारांना मी ओळखतो. स्टीलचा डबा पोलिसांनी जप्त केला नव्हता. आरोपीस मी घटनेपुर्वी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, चोरीला गेलेला मुद्देमाल

माझा नाही. १७०००/– रूपये मी एस.बी.आय. बॅकेतुन ऊसाच्या लागवडीकरीता काढुन आणले होते. कपाटाची चावी कधी लावलेली असते कधी नसते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरी चोरी झालेली नाही. माझा मुलगा आणि मुलगी संतोष टेलरकडे गेले होते हे मला माझ्या मुलांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. जप्त अंगठी माझीच असल्याचे ओळखणारी खुण त्या अंगठीवर नाही. ती अंगठी माझी नेहमीची वापरातील असल्याने ती माझीच असल्याचे मी ओळखतो. चोरीला गेलेल्या नोटांचे नंबर मला माहिती नाहीत.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.12 17:34:04 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक १२/०६/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा